

**आयसर : विज्ञान आणि कला चित्रकाला स्पर्धेत विज्ञानविषयक चित्र रेखाटण्यात मग्न झालेली मुले.**

# विद्यार्थ्यांनी रेखाटल्या विज्ञानातील गमती

**पुणे, ता. १२ :** विज्ञानाच्या प्रयोगशाळेतील गमती-जमती, अंतराळातील कल्पनाविश्व, तंत्रज्ञांच्या आधारे भविष्यातील जगाचे आराखडे, विज्ञान विश्वाबाबत मुलांच्या विविध कल्पना रेखाटण्याची मजा शालेय मुलांनी अनुभवली. निमित्त होते आयसर येथे आयोजित 'सायन्स अँड आर्ट' चित्रकला स्पर्धेचे....

द एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे आयोजित या स्पर्धेमध्ये शहरातील विविध शाळांमधील पाचवी ते दहावीमधील चारशे मुलांनी सहभाग नोंदविला. दोन भागांमध्ये झालेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना आयसर येथील संशोधक डॉ. मिलिंद वाटवे यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी कला आणि विज्ञान यांचा मेळ साधत विविध कलाकृती रेखाटल्या. विशेष म्हणजे काही विद्यार्थ्यांनी 'थ्री डी आर्ट' प्रकारातील चित्रांचे सादरीकरण केले. प्रदूषणमुक्त परिसर, अद्ययावत वाहतूक व्यवस्था आणि अंतराळविश्व यांसारख्या विषयावर चित्र काढण्यात मुले रमली होती. या वेळी डॉ. वाटवे यांनी मुलांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

स्पर्धेमध्ये लहान गटात स्वराज लांडगे (प्रथम), मानसी विश्वकारा (द्वितीय), रिद्धी लोखंडे (तृतीय) यांना, तर मोठ्या गटात मानसी निकम (प्रथम), सूरज जगदाळे (द्वितीय) व इशान चौबळ (तृतीय) यांना क्रमांक मिळाला.